# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
ई-मेल- jtdirrom@gmail.com website – www.jdteromumbai.com


परिपत्रक क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१६/ 460

अत्यंत महत्वाचे : कालमर्यादा दि. ९ व १०/२/२०१७

दिनांक : 07 FEB 2017

प्रति,
सर्व शासकीय, अशासकीय विनाअनुदानीत,
खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
एमबीए, एमसीए, वास्तुशास्त्र, अभियांत्रिकी पदवी/पदविका,
औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालये.

विषय : ईबीसी २०१६-१७च्या ऑनलाईन फॉर्म्समधील त्रुटींच्या पूर्ततेबाबत
खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत शिक्षण संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के प्रतिपूर्ती तसेच वसतीगृह निर्वाहभत्ता योजनेबाबत

शैक्षणिक वर्ष २०१६-१७च्या ऑनलाईन ईबीसी फॉर्म्स छाननीचे काम या कार्यालयामार्फत खालील चार विभागांद्वारे पूर्ण करण्यांत आलेले आहे.

| अ.क्र. | विभाग | छाननी केंद्र |
|---|---|---|
| १ | मुंबई | शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई<br>४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१. |
| २ | **ठाणे** | डॉ. व्ही.एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडिज, चेंदणी कोळीवाडा, ठाणे (पश्चिम) |
| ३ | नवी मुंबई | तेरणा इंजिनियरिंग कॉलेज, नेरुळ,<br>नवी मुंबई |
| ४ | कोकण | फिनोलेक्स ॲकॅडेमी ऑप मॅनेजमेंट ॲंड टेक्नॉलॉजी, रत्नागिरी |

शासनाने सदर ऑनलाईन फॉर्म्स ईबीसी पोर्टलवर मंजूर करुन घेण्याकरिताची मुदत दि. २७/०१/२०१७ पर्यंत निश्चित केल्यामुळे मुंबई, ठाणे, नवी मुंबई ह्या केंद्रातील छाननी प्रमुखांनी ज्या संस्थांना दि. ३० व ३१/०१/२०१७ ही तारीख त्रुटी पूर्ततेकरिता दिली होती. अशा संस्थांना दि. २७/०१/२०१७ पर्यंत छाननी पूर्तता करण्याबाबत कळविण्यांत आले होते. ज्या संस्थांनी दि. २७/०१/२०१७ पर्यंत त्रुटींची पूर्तता केलेली आहे, अशा विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यांत आले आहेत. परंतु अनिवार्य कागदपत्र न जोडलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज नामंजूर करण्यांत आले आहेत. **वास्तविक संस्थांनी या कार्यालयाच्या सूचनेनुसार एक छाननी समिती गठीत करुन या कार्यालयाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचना, परिपत्रके तसेच ओरिएंटेशन प्रोग्रॅम मध्ये दिलेल्या सूचनांनुसार एकही त्रुटी फॉर्म्समध्ये ठेवणे अपेक्षित नाही. त्यानुसार संस्थांकडून विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र व हमीपत्रही घेतले जाते. परंतु असे निदर्शनास आले आहे की, बहुतेक संस्था याकडे गांभिर्यपूर्वक लक्ष देत नाहीत. तसेच असेही निदर्शनास येत आहे की, ह्याकरिता आवश्यक असलेली छाननी समितीच संस्थांनी गठीत केलेली नाही. परिणामी विद्यार्थ्यांचे अर्ज नामंजूर होत आहेत. विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून एक विशेष बाब म्हणून संस्थांना त्रुटी पूर्ततेची संधी दिली जाते.**

दि. ३० व ३१ जानेवारी, २०१७ रोजी ज्या संस्थांना त्रुटी पूर्ततेकरिता संधी दिली होती. अशा सर्व संस्थांनी दि. ०९/०२/२०१७ व १०/०२/२०१७ रोजी सकाळी १० ते ११ या वेळेत खालील छाननीकेंद्रांमध्ये उपस्थित राहून त्यांच्या त्रुटींची पूर्तता करावयाची आहे. ही अंतिम संधी असल्यामुळे त्रुटी पूर्ततेकरिता यापुढे कोणत्याही परिस्थितीत संपर्क साधू नये.

...२.

| अ.क्र. | विभाग | छाननी केंद्र |
|---|---|---|
| १ | मुंबई | सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई |
| २ | **ठाणे** | डॉ. व्ही.एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, चेंदणी कोळीवाडा, ठाणे (पश्चिम) |
| ३ | नवी मुंबई | तेरणा इंजिनियरिंग कॉलेज, नेरुळ, नवी मुंबई |

मुंबई विभागासाठी छाननी केंद्रात झालेल्या बदलाची संबंधीतांनी नोंद घ्यावी. तसेच सर्व त्रुटींच्या पूर्ततेकरिता एक स्वतंत्र फाईल करावी व त्रुटींच्या तक्त्यांनुसार अनुक्रमे कागदपत्रे लावावीत. सदर फाईल्सवर संस्थेचा डिटीई कोड, नाव इ. नमूद करुनच सदर फाईलसह त्रुटींची पूर्तता करावयाची आहे.

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई
यांचेकरिता